# मुख्य कार्यालय, विरार
**विरार (प),**
**ता. वसई, जि. पालघर, पिन 401 303.**

दुरध्वनी : 0250-2525105/06/2529888/2529890
फॅक्स : 0250-2525107
ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com


**जावक क्र. : व.वि.श.म./ /**
**दि.२६/०४/२०२६**

## ०१ मे पासून घरगणना ;

## मोबाईलच्या ॲपवर भरा ३४ प्रश्नांची उत्तरे

देशात 'जनगणना २०२७' ला दि.०१ मे २०२७ पासून सुरुवात होत आहे. 'जनकल्याणासाठी जनगणना' हे ब्रीद घेऊन यंदा १६ वी जनगणना डिजिटल पद्धतीने घर सूचीकरण व लोकसंख्या गणना अशा दोन टप्यांत होत असून पहिल्या टप्प्यात येत्या ०१ मे ते १५ मे २०२६ या कालावधीत नागरिकांना 'स्वगणना' अंतर्गत स्वतःची माहिती ऑनलाइन पोर्टलवर भरण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यासाठी se.census.gov.in या पोर्टलवर लॉगिन करून माहिती भरल्यानंतर एक युनिक आयडी तयार होईल, जो संबंधित प्रगणकास सादर करणे अनिवार्य आहे. यानंतर १६ मे ते १४ जून, २०२६ या काळात नियुक्त प्रगणक प्रत्यक्ष घरांना भेटी देऊन माहिती संकलित करतील.

स्वगणना प्रक्रियेत ऑनलाइन पोर्टलवर खालीलप्रमाणे विचारलेल्या प्रश्नांची माहिती नागरिकांनी अचूक भरावयाची आहे.

१. घरांची स्थिती : इमारत क्रमांक

(नगरपालिका/स्थानिक संस्था अथवा गणना क्रमांक), गणना घर क्रमांक, गणना घराच्या जमिनीसाठी मुख्यतः वापरलेले साहित्य, गणना घराच्या भिंतींसाठी मुख्यतः वापरलेले साहित्य, गणनाघराच्या छपरासाठी मुख्यतः वापरलेले साहित्य, गणना घराच्या वापरासंबंधी खात्री करा, गणना घराची स्थिती, कुटुंब क्रमांक.

२. कुटुंबाची माहिती : कुटुंबात सामान्यतः निवास करणाऱ्या व्यक्तींची एकूण संख्या, कुटुंबप्रमुखाचे नाव, कुटुंबप्रमुखाचे लिंग, जर कुटुंब प्रमुख अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती/इतर प्रवर्गातील असल्यास, गणना घराच्या मालकी हक्काची स्थिती, केवळ या कुटुंबाच्या ताब्यात असलेल्या निवासयोग्य खोल्यांची संख्या, या कुटुंबात राहत असलेल्या विवाहित जोडप्यांची संख्या.

३. कुटुंबास उपलब्ध असलेल्या सोयी : पिण्याच्या पाण्याचा मुख्य स्रोत, पिण्याच्या पाण्याची उपलब्धता असलेला स्रोत, प्रकाशाचा मुख्य स्रोत, शौचालयाची उपलब्धता, शौचालयाचा प्रकार, सांडपाणी सोडण्यासाठी जोडलेली व्यवस्था, स्नानगृहाची उपलब्धता, स्वयंपाकघराची उपलब्धता आणि एलपीजी /पीएनजी जोडणी, वापरण्यात येणारे मुख्य इंधन. इ.

प्रत्येक घर व कुटुंबाची माहिती १ ते ३४ प्रश्नातून जाणून घेतली जाणार असून जनगणना कायदा १९४८ नुसार अचूक माहिती देणे नागरिकांना बंधनकारक आहे.

वसई विरार शहर महानगरपालिकेतील नागरिकांनी स्वगणना करून प्रश्नांची अचूक माहिती देऊन ०१ मे पासून सुरू होत असलेल्या या जनगणना प्रक्रियेत प्रशासनाला सहकार्य करावे. असे आवाहन महानगरपालिकेचे मा.महापौर श्री.अजीव पाटील यांनी केले आहे.